## संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठ
## परिपत्रक

क्रमांक - संगाबाअवि/१/१०९/२-२५६/२०२१ दिनांक - ७..५.२०२१

**विषय - संचारबंदी आदेश दि.९.५.२०२१ ते दि.१५.५.२०२१ पर्यंत**

संदर्भ - १) महाराष्ट्र शासन, महसुल व वने, आपत्ती व्यवस्थापन, व पुनर्वसन विभाग, मंत्रालय, मुंबई यांचे आदेश क्र.DMU/2020/CR.92,DisM-1, दि.२९.४.२०२०.

२) जिल्हाधिकारी, अमरावती यांचे आदेश क्र.कक्ष-२७/कलि/गृह विभाग/कावि-६९१/२०२१, दि.७.५.२०२१

उपरोक्त संदर्भ क्र.२ वरील आदेशान्वये जिल्हाधिकारी, अमरावती यांनी दि.९.५.२०२१ ते १५.५.२०२१ या कालावधीत संचारबंदीचे आदेश निर्गमित केले असून त्याची प्रत सोबत जोडली आहे. त्यानुषंगाने उपरोक्त कालावधीमध्ये संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठातील सर्व प्रशासकिय व शैक्षणिक विभागातील कामकाज संपुर्णतः बंद राहील. तथापि शैक्षणिक तथा प्रशासकीय विभाग प्रमुखांना त्यांचे विभागाचे कामकाज सुरु ठेवावयाचे असल्यास ते केवळ ऑनलाईन पद्धतीने सुरु ठेवता येईल. आणि त्यासंदर्भातील कर्मचाऱ्यांची उपस्थिती ही ऑनलाईन नोंदवावी.

आदेशान्वये-

स्वा/-
कुलसचिव,
संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ

**प्रत माहिती करीता सविनय सादर-**
मा.जिल्हाधिकारी तथा जिल्हादंडाधिकारी, अमरावती

**प्रतीलिपी माहिती तथा आवश्यक कार्यवाहीकरीता**
सर्व शैक्षणिक विभाग प्रमुख/प्रशासकीय अधिकारी, संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ

उपकुलसचिव (प्रशा.)
संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ

जिल्हाधिकारी कार्यालय, अमरावती
कॅम्प अमरावती ४४४ ६०२
(गृह विभाग)

: ०७२१-२६६२०२५/२६६२४९३ फॅक्स : ०७२१-२६६२८४३

Email:- homebranch.collamt@gmail.com Website :- www.amravati.nic.in


क्र. कक्ष-२७/कलि/गृह विभाग/कावि-६९९/२०२१ दिनांक :०७ /०५/२०२०

वाचा :- १. आपत्ती व्यवस्थापन कायदा-२००५
२. साथरोग प्रतिबंधात्मक कायदा १८९७
३. मा. मुख्य सचिव, महसूल व वन विभाग, आपत्ती व्यवस्थापन, मदत व पुर्नवसन विभाग, मंत्रालय मुंबई यांचेकडील सूचना पत्र (Break The Chain) क्रमांक:DMU/२०२०/CR.९२/DisM-१ दिनांक २७/०३/२०२१
४. या कार्यालयाकडील आदेश जा.क्र.कक्ष-२७/कलि/गृह विभाग/कावि-३४५/२०२१ दि. २८/०३/२०२१
५. मा. मुख्य सचिव, महसूल व वन विभाग, आपत्ती व्यवस्थापन, मदत व पुर्नवसन विभाग, मंत्रालय मुंबई यांचेकडील सूचना पत्र (Break The Chain) क्रमांक:DMU/२०२०/CR.९२/DisM-१ दिनांक ०४/०४/२०२१
६. या कार्यालयाकडील आदेश जा.क्र.कक्ष-२७/कलि/गृह विभाग/कावि-४२३/२०२१ दि. ०५/०४/२०२१
७. मा. मुख्य सचिव, महसूल व वन विभाग, आपत्ती व्यवस्थापन, मदत व पुर्नवसन विभाग, मंत्रालय मुंबई यांचेकडील सूचना पत्र (Break The Chain) क्रमांक:DMU/२०२०/CR.९२/DisM-१ दिनांक ०५/०४/२०२१
८. या कार्यालयाकडील आदेश जा.क्र.कक्ष-२७/कलि/गृह विभाग/कादि-४८०/२०२१ दि. ०६/०४/२०२१
९. मा. मुख्य सचिव, महसूल व वन विभाग, आपत्ती व्यवस्थापन, मदत व पुर्नवसन विभाग, मंत्रालय मुंबई यांचेकडील सूचना पत्र (Break The Chain) क्रमांक:DMU/२०२०/CR.९२/DisM-१ दिनांक १३/०४/२०२१
१०. या कार्यालयाकडील आदेश जा.क्र.कक्ष-२७/कलि/गृह विभाग/कावि-५२०/२०२१ दि. १४/०४/२०२१
११. मा. मुख्य सचिव, महसूल व वन विभाग, आपत्ती व्यवस्थापन, मदत व पुर्नवसन विभाग, मंत्रालय मुंबई यांचेकडील सूचना पत्र (Break The Chain) क्रमांक:DMU/२०२०/CR.९२/DisM-१ दिनांक २०/०४/२०२१
१२. या कार्यालयाकडील आदेश जा.क्र.कक्ष-२७/कलि/गृह विभाग/कावि-५६९/२०२१ दि. २०/०४/२०२१
१३. मा. मुख्य सचिव, महसूल व वन विभाग, आपत्ती व्यवस्थापन, मदत व पुर्नवसन विभाग, मंत्रालय मुंबई यांचेकडील सूचना पत्र (Break The Chain) क्रमांक:DMU/२०२०/CR.९२/DisM-१ दिनांक २१/०४/२०२१
१४. या कार्यालयाकडील आदेश जा.क्र.कक्ष-२७/कलि/गृह विभाग/कावि-५६९/२०२१ दि. २२/०४/२०२१
१५. मा. मुख्य सचिव, महसूल व वन विभाग, आपत्ती व्यवस्थापन, मदत व पुर्नवसन विभाग, मंत्रालय मुंबई यांचेकडील सूचना पत्र (Break The Chain) क्रमांक:DMU/२०२०/CR.९२/DisM-१ दिनांक २९/०४/२०२१
१६. या कार्यालयाकडील आदेश जा.क्र.कक्ष-२७/कलि/गृह विभाग/कावि-६३७/२०२१ दि. ३०/०४/२०२१

## आदेश

### (संचारबंदी आदेश दिनांक ०९/०५/२०२१ ते दि. १५/०५/२०२१ पर्यंत)

ज्या अर्थी कोविड-१९ विषाणूच्या संसर्गाचा प्रादुर्भाव झपाटयाने वाढत असल्याने आपात्कालीन उपाययोजनेचा भाग म्हणून मा. मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य यांनी संपूर्ण महाराष्ट्र राज्याचे क्षेत्रात लॉकडाऊन (Break The Chain) ची घोषणा केलेली असून "(Break The Chain)" अंतर्गत संदर्भिय क्र. ३ अन्वये निर्गमित केलेल्या अधिसूचनेनुसार संदर्भिय क्र. ४ अन्वये दिनांक ३०/०४/२०२१ पर्यंत संचारबंदी लागू करण्यात आलेली आहे. तदनंतर संदर्भिय क्र. ५ व ७ च्या अधिसूचनेनुसार संदर्भिय क्र. ६ व ८ अन्वये आदेश पारीत करण्यात आले आहे.

त्याअर्थी मी शैलेश नवाल, जिल्हादंडाधिकारी तथा अध्यक्ष आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण, अमरावती मला प्राप्त झालेल्या अधिकारानुसार सद्यस्थितीमध्ये जिल्हयातील वाढते रुग्णांचे प्रमाण लक्षात घेता संपूर्ण अमरावती जिल्हयाकरीता दि. ०९/०५/२०२१ रोजी दुपारी १२.०० वाजतापासून ते दि. १५/०५/२०२१ रोजीचे रात्री १२.०० वा. पर्यंत खालील प्रमाणे प्रतिबंधात्मक आदेश पारीत करीत आहे.

१. कोणत्याही व्यक्तीस अत्यावश्यक आणि वैद्यकीय कारणाशिवाय घराबाहेर पडण्यास पुर्णता बंदी राहील.

7/5/2021

२. सर्व किराणा माल, भाजीपाला दुकाने, फळ विक्रेते, डेअरी, बेकरी, मिठाई, पिठाची गिरणी इत्यादी दुकाने तसेच खाद्यपदार्थांची सर्व दुकाने (कोबडी मटन पोल्ट्री मासे व अंडी यासह), सर्व प्रकारची मद्यागृह, मद्यदुकाने व बार ही दुकाने पुर्ण पणे बंद राहतील तथापी सदर दुकानांची घरपोच सेवा सकाळी ०७.०० ते सकाळी ११.०० या कालावधीत चालू ठेवणेस परवानगी राहील. कोणत्याही परिस्थितीत ग्राहकास दुकानात स्वत: जावुन खरेदी करता येणार नाही. याबाबतचे नियोजन हे आयुक्त महानगरपालीका तसेच मुख्याधिकारी, नगरपरिषद/नगरपालीका हे त्यांचे स्तरावरुन करतील.

३. हॉटेल, रेस्टॉरंट,खानावळ, शिवभोजन थाळी यांची घरपोच पार्सल सेवा सकाळी ११.०० ते सायंकाळी ०७.०० वाजेपर्यंत सुरु राहील. कोणत्याही परिस्थितीत ग्राहकास हॉटेल, रेस्टॉरंट, खानावळ, शिवभोजन थाळी येथे स्वत जावुन पार्सल घेता येणार नाही. सदर ठिकाणी ग्राहक आढळून आल्यास संबधीत आस्थापनेवर कायदेशिर कारवाई केली जाईल. याबाबतील पर्यवेक्षणाची जबाबदारी स्थानिक स्वराज्य संस्था/स्थानिक पोलीस स्टेशन व जिल्हा पुरवठा अधिकारी यांची राहील.

४. उक्त कालावधीत जिल्हयातील सर्व कृषी उत्पन बाजार समित्या, आणि भाजी मार्केट, आठवडी बाजार बंद राहतील. या बाबतची जबाबदारी जिल्हा उपनिबंधक,सहकारी संस्था यांची राहील.

५. पाळीव प्राण्याच्या खाद्यपदार्थाची दुकाने, पावसाळयाच्या हंगामात व्यक्तीसांठी तसेच संस्थासाठी संबधीत असणाऱ्या साहित्यांच्या उत्पादनाच्या निगडीत दुकाने पुर्णपणे बंद राहतील. तथापी सदर दुकानांची फक्त घरपोच सेवा सकाळी ०७.०० ते सकाळी ११.०० या कालावधीत चालु ठेवणेस परवानगी राहील. जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी, जि.प.अमरावती यांची संनियंत्रणाची जबाबदारी राहील.

६. कृषी अवजारे व शेतातील उत्पादनाशी संबधीत दुकाने पुर्णपणे बंद राहतील तथापी शेतकऱ्यांना आवश्यक त्या वस्तुचा पुरवठा घरापर्यंत तसेच बांधापर्यंत करण्याची जबाबदारी ग्रामपंचायत स्तरावर संबधीत कृषी सयक, तालुकास्तरावर तालुका कृषी अधिकारी यांची राहील. जिल्हयात सदर प्रकियेचे नियोजन व नियंत्रण करण्याची जबाबदारी जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी अमरावती यांची राहील.

७. सार्वजनिक, खाजगी क्रिडांगणे, मोकळयाजागा, उद्याणे बगिचे पुर्णता बंद राहतील.

८. सर्व केशकर्तनालय,सलुन, स्पा,ब्युटीपार्लर संपुर्णत: बंद राहतील.

९. शाळा महाविद्यालये, शैक्षणिक संस्था, प्रशिक्षण संस्था सर्व प्रकारची शिकवणी वर्ग संपुर्णता बंद राहतील. तथापी ऑनलाईन शिक्षणास प्रतिबंध राहणार नाही. नियोजन व नियंत्रण करण्याची जबाबदारी शिक्षणाधिकारी (माध्यमीक) जि.प.अमरावती यांची राहील

१०. सर्व प्रकारचे स्वागत समारंभ, मंगल कार्यालये, हॉल हे पुर्णता बंद राहतील लग्न समारंभ करावयाचा असल्यास तो साध्या पध्दतीने घरगुती स्वरुपात करण्यात यावा. लग्नामध्ये मिरवणूक, जेवणावळी, बँडपथक यांना परवानगी अनुज्ञेय राहणार नाही. लग्न समारंभाकरीता केवळ १५ लोक उपस्थित राहण्याची परवानगी असेल व सदरचा लग्न सोहळा हा २ तासापेक्षा जास्त चालणार नाही याची दक्षता घ्यावी. विवाह सोहळा बेकायदेशीररित्या पार पडणार नाही याची संबधीत ग्रामस्तरीय कोरोना नियंत्रण समिती यांनी दक्षता घ्यावी व नियमानुसार त्यांच्यावर कायदेशीर कारवाई केली जाईल. लग्न समारंभाबाबतचे नियोजन व नियंत्रण करण्याची जबाबदारी संबंधीत स्थानिक स्वराज्य संस्था/पोलिस ठाण्याचे प्रभारी अधिकाऱ्याची राहील.

११. सर्व चित्रपट गृहे, व्यायमशाळा, जलतरण तलाव, करमणुक व्यवसाय नाटयगृह, कलाकेंद्र, प्रेक्षकगृहे, सभागृहे संपुर्णत: बंद राहील.

१२. सर्व खाजगी व सार्वजनीक वैद्यकीय सेवा, पशुचिकीत्सा सेवा, त्यांचे नियमीत वेळेनुसार सुरु राहतील.

१३. मेडीकल स्टोअर्स व दवाखाने तसेच ऑनलाईन औषध सेवा २४ तास कालावधीत सुरु राहतील.

१४. चष्म्याची दुकाने बंद राहतील परंतु आपत्कालीन परिस्थितीमध्ये रुग्णांस डोळयांच्या डॉक्टरांनी त्यांच्या दवाखान्यास/हॉस्पीटल यास जोडण्यात आलेल्या चष्मा दुकानातुन चष्मा उपलब्ध करुण देण्याची जबाबदारी राहील.

१५. सर्व पेट्रोलपंपावर या आदेशान्वये नमुद करण्यात आलेल्या, परवानगी दिलेल्या बाबींकरीताच पेट्रोल वितरित करण्यात यावेत. मालवाहतूक, रुग्णवाहीका, शासकीय वाहने, अत्यावश्यक सेवेतील कर्मचारी, परवानगी पास असलेली वाहने यांचे करीता पेट्रोल डिझेल याची उपलब्धता करुन देण्याबाबतची जबाबदारी कंपनीचे अधिकारी व उप प्रादेशीक परिवहन अधिकारी यांची राहील. उप प्रादेशीक परिवहन अधिकारी यांनी याबाबतचा दैनंदिन अहवाल जिल्हाधिकारी कार्यालयास सादर करावा.

१६. गॅस एजन्सीज मार्फत घरपोच गॅस सिलेंडरचे वितरण करण्यात यावे. परंतु ग्राहकांनी गॅस एजन्सी मध्ये प्रत्यक्ष येऊन गॅस नोंदणी करण्यास अथवा सिलेंडर घेण्यास प्रतिबंध राहील. गॅस एजन्सी येथे ग्राहक आढळुन आल्यास संबधीत एजन्सी कारवाईस पात्र राहील. पर्यवेक्षणाची जबाबदारी जिल्हा पुरवठा अधिकारी यांची राहील.

१७. सर्व शासकीय, निमशासकीय, खाजगी कार्यालये व आस्थापना सदर कालावधीत बंद राहतील, वित्त व्यवसायाशी निगडीत सर्व कार्यालये यांचा देखील समावेश राहील. या सर्व कार्यालयांना आपले कामकाज सुरु ठेवावयाचे असल्यास ते केवळ ऑनलाईन पध्दतीने सुरु ठेवता येईल आणि सर्व विभाग प्रमुखांनी त्यांचे सर्व कर्मचारी यांची उपस्थिती ही ऑनलाईन नोंदवावी. केवळ अत्यावश्यक सेवा व कोरोना प्रतिबंधात्मक उपाययोजना यांच्याशी संबधीत शासकीय, निमशासकीय कार्यालये सुरु राहतील उदा. महसूल विभाग, ग्रामपंचायत, आरोग्य सेवा, महानगरपालीका इ.

१८. सर्व बँका, पतसंस्था, पोष्ट ऑफीसेस ही कार्यालये नागरीकांसाठी अत्यावश्यक कामासाठी सकाळी १०.०० ते दुपारी २.०० पर्यंत सुरु राहतील तसेच ग्राहकांना ऑनलाईन सेवा पुरविण्यात याव्यात.

१९. सर्व आपले सरकार सेवा केंद्रे व सेतु केंद्रे नागरीकांकरीता बंद ठेवण्यात येत आहेत तथापी नागरीकांना ऑनलाईन स्वरुपात वेगवेगळया प्रमाणपत्र व सुविधा करीता अर्ज सादर करता येतील.

२०. उक्त कालावधीत दस्त नोंदणीचे काम पुर्णपणे बंद राहील.

२१. MIDC, उद्योग, कारखाने, सुतगिरणी येथे केवळ In-situ पध्दतीने कामकाज सुरु राहील याबाबतची संनियंत्रणाची जबाबदारी प्रादेशिक अधिकारी, महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ (MIDC), अमरावती व व्यवस्थापक, जिल्हा उद्योग केंद्र, यांच्यावर राहील.

२२. शासकीय यंत्रणा मार्फत मान्सुनपुर्व विकासकामे आवश्यक पाणीपुरवठा व टंचाई विषयक कामे चालु राहतील. संबधीत शासकीय यंत्रणांना या करीता वेगळया परवानगीची आवश्यकता नाही.

२३. सर्व शासकीय कार्यालये अभ्यागंतासाठी पुर्णत: बंद ठेवण्यात येत आहेत अतिआवश्यक कामासाठी या कार्यालयाच्या टोल फ्री क्रमांकावर (ई संवाद टोल फ्री क्रमांक- १८०० २३३ ६३९६) संपर्क करावा.

२४. दुध संकलन केंद्रे व घरपोच दुध वितरण व्यवस्था यांना सकाळी ०७.०० ते ११.०० वाजेपर्यंत परवानगी राहील.

२५. ई-कॉमर्स मार्फत अत्यावश्यक घरपोच सेवा सुरु राहतील. तसेच स्थानिक दुकानदार, हॉटेल यांचे मार्फत घरपोच सेवा पुरविणारे कामगार यांच्याकडे ग्राहकांच्या घरी जाताना बिल व संबधीत दुकानदारां मार्फत देण्यात येणारे ओळखपत्र सोबत बाळगणे अनिवार्य राहील या बाबतचे नियोजन महानगरपालीका आणि स्थानिक स्वराज्य संस्था यांनी करावे. संबधीत कर्मचाऱ्यांना निगेटीव्ह RTPCR चाचणी अहवाल सोबत बाळगणे बंधनकारक राहील.

२६. सर्व सार्वजनिक तसेच खाजगी बस वाहतुक, रिक्षा, चारचाकी व दुचाकी वाहने, यांची वाहतुक नागरिकांना अत्यावश्यक कामाकरीता फक्त अनुज्ञेय राहील. अत्यावश्यक सेवेतील कर्मचाऱ्यांना ओळखपत्र सोबत बाळगणे बंधनकारक राहील, तसेच रुग्णांकरीता रिक्षा व खाजगी वाहनास परवानगी राहील. याबाबतीत नियंत्रण व नियोजनाची जबाबदारी पोलीस वाहतुक शाखेकडे राहील.

२७. जिल्हयाच्या मालवाहतुक व रुग्णवाहतुक करणाऱ्या वाहनास व शासकीय वाहनास स्वतंत्र परवानगीची गरज असणार नाही तथापी मालवाहतूक साठा, खत साठा इ. बाबतीत फक्त लोडींग व अनलोडींग करण्यास परवानगी अनुज्ञेय राहील. इतर कारणांकरीता व आवश्यक वैद्यकीय कारणांकरीता जिल्हयाबाहेर वाहतूक करावयाची असल्यास https://covid१९.mhpolice.in/ या वेबसाईटवरुन ई-पास काढून वाहतूक करता येईल.

२८. उक्त निर्देशांचे काटेकोर अमलबजावणी करण्याची जबाबदारी अमरावती महानगापालीका क्षेत्राकरीता आयुक्त, नगरपरिषद/नगरपालीका क्षेत्राकरीता संबंधित मुख्याधिकारी तसेच ग्रामीण भागाकरीता संबंधित तालुक्याचे गट विकास अधिकारी यांची राहील व या सर्व प्रक्रियेवर नियंत्रण ठेवण्याची जबाबदारी ही संबंधित तालुक्याचे Incident Commander तथा तहसिलदार व पोलीस विभाग यांची राहील.

२९. वरिल प्रमाणे आदेश सर्व आस्थापनांना काटेकोरपणे लागु होतील तसेच कोणत्याही क्षेत्रास कामकाज सुरु ठेवण्याकरीता विशेष परवानगी दिनांक १५/०५/२०२१ पर्यंत देण्यात येणार नाही सर्व आस्थापना यांनी कोरोना संक्रमण साखळी तोडण्याकरीता आपआपल्या स्तरावरुन त्रिसुत्री पध्दतीची अंमलबजावणी करावी.

सदर आदेशाचा भंग करणाऱ्या कोणत्याही व्यक्तीने भारतीय दंड संहिता- १८६० च्या कलम १८८ अन्वये शिक्षापात्र असलेला अपराध केला आहे असे मानण्यात येईल व संबंधितावर सदर कलमानुसार कारवाई करण्यात येईल अशा व्यक्ती, संस्था, संघटना यांचेवर गुन्हे दाखल करण्यासाठी संबंधित पोलीस स्टेशनचे पोलीस उपनिरीक्षक दर्जापेक्षा कमी नाही अशा अधिकाऱ्यास या आदेशान्वये पुढील आदेशापर्यंत प्राधिकृत करण्यात येत आहे.

सदरचे आदेश हे दिनांक ०९/०५/२०२१ चे दुपारी १२.०० वाजतापासून दिनांक १५/०५/२०२१ चे रात्री १२.०० पर्यंत संपूर्ण अमरावती शहर व जिल्हयातील शहरी व ग्रामीण भागाकरीता लागू राहतील. या आदेशाची मोठया प्रमाणात जनजागृती करावी व स्थानिक प्रशासन, पोलीस विभाग, स्थानिक स्वराज्य संस्था यांनी प्रसिध्दी देऊन कार्यवाही करावी.

(शैलेश नवाल) 7/5
जिल्हादंडाधिकारी अमरावती

**प्रतिलिपी:-**

१. मा. विभागीय आयुक्त, अमरावती विभाग, अमरावती यांना माहितीकरीता सविनय सादर.
२. मा. पोलीस आयुक्त (शहर) यांना माहिती व उचित कार्यवाहीकरीता.
३. मा. पोलीस अधिक्षक (ग्रामीण) अमरावती यांना माहिती व उचित कार्यवाहीकरीता.
४. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, अमरावती यांना माहिती व उचित कार्यवाहीकरीता.
५. आयुक्त, महानगरपालीका अमरावती यांना माहिती व उचित कार्यवाहीकरीता.
६. मुख्य वनसंरक्षक, वन विभाग अमरावती यांना माहिती व उचित कार्यवाहीकरीता.
७. कुलसचिव, संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठ, अमरावती यांना माहिती व कार्यवाहीकरीता.
८. प्रादेशिक परिवहन अधिकारी, अमरावती यांना माहिती व उचित कार्यवाहीकरीता.
९. अधिक्षक, राष्ट्रीय महामार्ग पोलीस, अमरावती यांना माहिती व कार्यवाहीकरीता.
१०. पोलीस वाहतूक शाखा (शहर/ग्रामीण) अमरावती यांना माहिती व कार्यवाहीकरीता
११. उपविभागीय दंडाधिकारी ------------------------(सर्व) यांना माहिती व उचित कार्यवाहीस.
१२. तहसिलदार तथा तालुका दंडाधिकारी ------------------------(सर्व) यांना माहिती व उचित कार्यवाहीस
१३. मुख्याधिकारी नगर परिषद/पंचायत ------------------------(सर्व) यांना माहिती व उचित कार्यवाहीस
१४. जिल्हा माहिती अधिकारी अमरावती- **सदर आदेशास अमरावती जिल्हयामधील स्थानिक वृत्तपत्रातून प्रसिध्दी देण्यात यावी.**
१५. अधिक्षक, राज्य उत्पादन शुल्क विभाग, अमरावती यांना माहिती व आवश्यक कार्यवाहीकरीता.
१६. प्रादेशिक अधिकारी, महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ (MIDC) अमरावती यांना माहिती व कार्यवाहीकरीता
१७. विभाग नियंत्रक, महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळ, अमरावती यांना माहिती व कार्यवाहीकरीता.
१८. सहा. आयुक्त (कामगार/अन्न व औषधी प्रशासन/समाज कल्याण विभाग) यांना माहिती व उचित कार्यवाहीकरीता.
१९. संबंधित सर्व विभाग ------------------------यांना माहिती व आवश्यक कार्यवाहीकरीता.

जिल्हादंडाधिकारी अमरावती